नि. फौ. ख. क्र. ६८/२०२१
सरकार वि. गणेश
<u>निशाणी क्रं.२६</u>

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं.०३ चा पुरावा शपथेवर सुरू**

नावः शिवलाल बाबुराव ठेंगडे.
वयः ४६ वर्षे, धंदाः शेती,
पत्ताः पळसवाडी, खुलताबाद
ता. खुलताबाद, जि. छ.संभाजीनगर

**<u>अभियोग पक्षातर्फे सरकारी वकिल श्री. एस.ए.बनसोडे यांच्यामार्फत साक्षीदाराचा सरतपास सुरु</u>**

**०१.** मी आरोपींना तसेच फिर्यादीला ओळखतो. पोलीसांनी मला दिनांक १५ जुन २०२० विवेकानंद याच्या शेतात बोलवले होते. तेथे पंचनामा झाला. त्यांनी कु-हाड बघितली आम्ही केवळ पंचनामयावर सही केली.

**प्रश्न** - त्यांनी कु-हाडीचे काय केले ?

**उत्तर** - त्यांनी ती कु-हाड हातात घेतली.

आता मला अभिलेखावरील जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि.क्र. २७ देण्यात येते.

**प्रश्न** - ती कु-हाड पाहिल्यावर तुम्ही ओळखू शकाल काय **?**

**उत्तर** - ती कु-हाड फणशी होती.

सदर कु-हाड हातात घेउन साहेबांनी पंचनामा केला. आता मला सदर गुन्हयाकामी दोषारोप पत्रासोबत दाखल केलेली कु-हाड दाखवण्यात आली. सदर गोष्टीला सहा वर्षे झाली असल्याने सदर कु-हाड हीच होती काय हे मी सांगू शकत नाही. ही कु-हाड देखील फणाशी आहे. त्यावर लावलेल्या लेबलवर माझी सही आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. डी.पी.काळे यांच्यामार्फत उलटतपास सुरु.</u>**

०२. माझे शिक्षण इ.१० वीपर्यंत झालेले आहे. मला मराठी लिहिता वाचता येते. फिर्यादी माझे सख्खे चुलतभाऊ लागतात. पंचनाम्यासाठी पोलीसांनी मला लेखी नोटीस दिली नाही. फिर्यादीच्या शेताला लागून माझे शेत नाही. मी राहायला गावात आहे. गावापासून विवेकानंदचे शेत एक कि.मी. आहे. मी त्यांचे शेत पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादीच्या शेताच्या मधल्या बांधावर तारकंपाउंड आहे. पंचनाम्याच्या वेळेस पोलीस आणि आम्ही असे एकूण आठ एक लोक होतो. त्यावेळेस सर्जेराम वामन ठेंगडे, विवेकानंद सर्जेराव ठेंगडे, बाळकृष्ण

आसाराम ठेंगडे, शिवदास बाबुराव ठेंगडे आम्ही चौथे जण व इतर पोलीसवाले होते. मी पोलीसावाल्यांना त्यांचे नाव गाव विचारले नाही.

**प्रश्न** - पोलीस घटनास्थळी पोहोचल्यानंतर तुम्ही तेथे किती वेळात तिथे पोहोचला?

**उत्तर** - पोलीस आम्हाला गावात भेटेले. त्यांनी शेतात काम आहे असे सांगितिले. त्यानंतर आम्ही त्यांच्या सोबत शेतात गेलो.

पोलीस दिवसाला दोन ते तीन वाजण्याच्या दरम्यान भेटले होते. पोलीस ज्याठिकाणी भेटले तेथून घटनास्थळी जायला अंदाजे १५ मिनिटे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही घटनास्थळी १५ मिनिटे थांबलो. हे म्हणणे खरे आहे की, १५ मिनिटांनी मी जिथे होतो तेथे परत आलो. मी एक ते दोन कागदावर सही केली होती.

**प्रश्न** - तुम्ही ज्या कागदावर सह्या केल्या ते कोरे होते किंवा त्यावर काही लिहिले होते ?

**उत्तर** - त्यावर लिहिलेले होते.

हे म्हणणे खरे आहे की, माझ्यासमक्ष मी सही केलेला कागद कोठेही चिकटवला नाही. ज्याठिकाणी झगडे झाले होते त्याठिकाणी ती कु-हाड पडलेली होती. विवेकानंद व त्यांच्या वडीलांनी ती कु-हाड दाखवली होती. ती कु-हाड विवेकानंद यांच्या शेतातील तारकंपाउंडच्या आतमध्ये होती. हे म्हणणे खरे आहे की, सर्व शेतक-यांकडे सदर प्रकारच्या कु-हाडी राहतात. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेसे सदर ठिकाणी कोणतेही आरोपी नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी काहीही तोडताड केलेले दिसून आलेले नाही. मी स्वतःहून सांगतो की, लहान रोपे तोडलेली होती. त्या ठिकाणी लाकडे माझ्यासमक्ष जप्त केली.

०३. घटनेच्या दुस-या दिवशी पोलीस पंचनाम्यासाठी आले होते.

**प्रश्न** - घटनास्थळी पंचनामा करतेवेळेस त्याठिकाणी तेथील माती कोरी होती किंवा ओली होती?

**उत्तर** - पंचनामा कोणत्या महिन्यात झाले हे मला आठवत नाही. कारण सदर गोष्टीला सहा वर्षे झाली.

**प्रश्न** - पोलीसांनी केलेल्या पंचनाम्यामध्ये ती कु-हाड फणशी असल्याबाबत लिहिले होते का?

**उत्तर** - लिहिले होते, परंतू ते मला सध्या आठवत नाही.

**प्रश्न** हे म्हणणे खरे होइल काय की, त्या पंचनाम्यात काय लिहिले हे तुम्हाला सांगता येणार नाही?

**उत्तर** - आज सांगू शकत नाही.

हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष कोणतीही फणशी कु-हाड जप्त केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणताही पंचनामा माझ्यासमक्ष झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यावर सह्या गावात केल्या. सदर पंचनाम्यावर मी व बाळकृष्ण ठेंगडे सहया केल्या. आमच्या व्यतिरिक्त इतर कोणीही सही केली नाही.

**प्रश्न** - हे म्हणणे खरे होईल काय की, तुमच्या समक्ष आरोपी, फिर्यादी ,फिर्यादीचे वडील किंवा

पोलीसांनी सही केली नाही?

**उत्तर** - पोलीस नंतरही सहया करु शकतात.

**प्रश्न** - हे म्हणणे खरे होइल काय की, तुमच्या समक्ष सदर पंचनाम्यावर पोलीसांनी सही केली नाही?

**उत्तर** - नाही केले असे समजून घ्या.

हे म्हणणे खरे आहे की, कु-हाडीचे किती प्रकार आहेत हे मी सांगू शकत नाही. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये बांधावरुन वाद होता. फिर्यादीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचे काही क्षेत्र आरोपींकडे निघते. हे मी सांगू शकत नाही की, फिर्यादीने ती जागा आरोपींकडून काढून घ्यावी यासाठी नातेवाइक आणि पंचांनी तसा प्रस्ताव केला आहे. आरोपी व फिर्यादी यांच्यात वाद होउ नये यासाठी मी नातेवाईक म्हणून त्या दोघांना समजावण्याचा प्रयत्न केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही कु-हाड जप्त केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा पंचनामा खोटा तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझा पुतन्या असल्याने मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

दिनांक २१.०७.२०२६ श्रवणोत्तर स्विकृती

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ALOK ASHOK PANDEY
Date: 2026.07.21 16:44:38 +0530

**(आलोक अशोक पांडे)**
सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खुलताबाद.